दिव्य मराठी

लातूर जिल्हा 21-09-2024

आवाहन करण्यात आले आहे.

क्विक हिल फाउंडेशनचा उपक्रम • वेदांत भुशेट्टे महाविद्यालयात देताहेत सायबर सुरक्षेचे धडे

# विद्यार्थ्यांत सायबर धोके, संरक्षणाबाबत जागृती

अहमदपूर | प्रतिनिधी

डिजिटल युगात इंटरनेट आणि तंत्रज्ञानाच्या वापरामुळे सायबर सुरक्षेच्या महत्वाची जाणीव वाढली आहे. याच पार्श्वभूमीवर, क्विक हिल फाउंडेशनने \'सायबर शिखा फॉर सायबर सुरक्षा' हा एक जागरूकता कार्यक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे वेदांत भुशेट्टे हा युवा विद्यार्थी याने सायबर क्राइम कसे होतात, हे सांगत आहे.

सायबर शिखा फॉर सायबर सुरक्षा हा प्रकल्प विद्यार्थ्यांना सायबर धोके आणि त्यापासून



वेदांत भुशेट्टे हे शाळा, महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत आहेत.

संरक्षण याबद्दल जागरूक करण्यासाठी चालवला जात आहे. हा कार्यक्रम विविध शाळा आणि महाविद्यालयांमध्ये आयोजित केला जात असून, विद्यार्थ्यांना सुरक्षित इंटरनेट वापर, पासवर्ड सुरक्षा, फिशिंग आक्रमणांची ओळख आणि इतर सायबर सुरक्षेशी

### ... तरच आपली वैयक्तिक माहिती सुरक्षित

वेदांत भुशेट्टे यांच्या मते, 'सायबर सुरक्षेच्या आधारेच आपली वैयक्तिक माहिती सुरक्षित राहते. आम्ही विद्यार्थ्यांना डिजिटल सुरक्षिततेच्या महत्वाची माहिती देण्याचा प्रयत्न करीत आहोत. सायबर धोके टाळण्यासाठी योग्य माहिती आणि जागरूकता असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना सायबर धोके ओळखण्याच्या आणि त्यापासून संरक्षणाच्या उपायांबद्दल शिकवणे हेच आमचे मुख्य उद्दिष्ट आहे.

संबंधित माहिती प्रदान करण्यात येत आहे. स्वामी विवेकानंद विद्यालयात ही जनजागृती करण्यात आली. मुख्याध्यापक दिपक भराटे, गणेश भुशेट्टे व सर्व शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. या उपक्रमात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी, सायबर सुरक्षेच्या महत्वाविषयीचे विचार स्पष्ट केले. या उपक्रमामुळे विद्यार्थी सुरक्षित इंटरनेट वापरणे शिकतील आणि भविष्यात सायबर धोके टाळण्यासाठी सजग राहतील, असा विश्वास क्विक हिल फाउंडेशनने यावेळी व्यक्त केला.